शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१


"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव

• Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC • ISO मानांकन 9001:2015 •

ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे

| | | |
|---|---|---|
| लोकनाटय कलांचे बदलते स्वरूप : लोकनाटय तमाशा | युवराज तानाजीराव खरात | १६१ |
| कोरकू आदिवासींचे विधीनाट्य : खम | डॉ.धनंजय महादेव होनमाने | १६५ |
| लोकसाहित्य आणि ललित साहित्य यांचा अनुबंध | डॉ. उदय रामचंद्र जाधव | १६९ |
| स्त्रीमनाचे उत्कट आविष्कार: 'उखाणे ' | डॉ.मानसी जगदाळे | १७३ |
| लोकसाहित्याचा मौखिक आविष्कार : लोकगीते | डॉ.कदम संभाजी धोंडीराम | १७७ |
| लोकपरंपरेतील लोककथागीतांचे स्वरूप विशेष | डॉ.अमर कांबळे | १८१ |
| लोककला सोंगीभजन : बदलती आविष्कार रुपे | निवृत्ती दत्तू कार्वेकर | १८५ |
| आदिवासी लोकगीतांमधील स्त्रीग दर्शन | केशव धोंडिबा टिपरसे | १८८ |
| कीर्तन परंपरेचे स्वरूप व सद्यस्थिती | भारती श्रीधर कोळेकर | १९१ |
| महाराष्ट्रातील आदिवासींची लोकनृत्ये: भवाडा आणिदंडार | प्रियांका अशोक कुंभार | १९४ |
| संत एकनाथांच्या भारूडातील लोकाविष्कार | सौ.शुभांगी तानाजी कुंभार | १९८ |
| हादगा गीतातील स्त्रीसंवेदना | डॉ. लता पांडुरंग मोरे | २०१ |
| महाराष्ट्रातील सण–उत्संव परंपरा–अध्यात्म् व वैज्ञानिकता | लक्ष्मी पवार | २०४ |
| प्रयोगरूप लोककलांचा सृजनात्मक आविष्कार | डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | २०७ |
| गजीढोल: एक लोकाविष्कार | संतोष लोंढे | २११ |
| भारतीय व पाश्चात्य लोकसंस्कृतीच्या आविष्कार रूपांमधीलअनुबंध | डॉ.स्नेहा सुवास प्रभु महांबरे | २१३ |
| जात्यावरच्या ओव्या–स्त्रीमनाचा भावनाविष्कार | डॉ.सविता अशोक माळी | २१८ |
| मराठी लोकनाटयाची परंपरा व अभिव्यक्तीचे वेगळेपण | प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे | २२२ |



ISSN No. 2319-6025

# जात्यावरच्या ओव्या – स्त्रीमनाचा भावनाविष्कार

**डॉ.सविता अशोक माळी**
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय,
कडेगाव

स्त्रियांनी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी गीतांचा आधार घेतला आहे. समूहगीते, विधीगीते, नृत्य,खेळगीते, सण, उत्सवगीते, इ. प्रकारच्या गीतातून आपले मन हलके केलेले दिसते.

जात्यावर दळण दळताना, कांडताना, काम करताना स्त्रियाओव्या म्हणतात. मन हलके करताना तिच्या तोंडूननिघणारे शब्द तिच्या जीवनातील, संसारातील, नातेसंबंधाविषयी असलेले दिसतात आणि त्यातूनच तिचे भावविश्व साकारते. जात्यावरील ओवीचे स्वरूप बव्हंश वेळेला सहजोद्गाराचे असते. त्यात उत्कटता आणि ताजेपणा यांचे मिश्रण असते. स्वाभाविकच या ओव्यांमध्ये व्यक्तिगत भावानुभव अभिव्यक्त झालेले दिसतात. जात्यावरील ओव्यांमध्ये मुक्त भावाविष्कारअसतो.

जात्यावर दळण दळतांनास्त्रिया शारीरिक व मानसिक कष्ट विसरतात. काम करताना शरीराला होणारे कष्ट आणि सासरी झालेल्या जाचाला त्रासलेली स्त्री जात्यावर जेंव्हा ओवी म्हणते तेंव्हा तल्लीन होते व आपले दुःखं विसरते. जात्यावरच्या ओवीत स्त्रिया जीवनात आलेले अनुभव मनापासून गातात. त्यामुळे त्या भावपूर्ण असतात. संसारातील सुख–दुःखाचा प्रामाणिक आणि उत्कट आविष्कार असतो. ओवी गाताना स्त्रियाएवढयामग्न झालेल्या असतात की आपल्या अवतीभोवती कुणी श्रोता किंवा प्रेक्षक आहे. याचे भानही गाणाऱ्या स्त्रीला नसते. कुणी ऐकावे म्हणून त्या ओव्यागात नाहीत. त्यांचा आविष्कार सहज स्वाभाविकपणे होतो. तर मग कधी कधी त्यांच्याही नकळत हा आविष्कार झालेला असतो. कुटुंबातील निरनिराळ्या व्यक्तीच्या भावनासंबंधीचे अत्यंत हळूवारपणे केलेले चित्रण असते. संसारातील सुख–दुःखांचा प्रामाणिक आणि उत्कट आविष्कार असतो. ओवीगीते स्वायत्त आणि भावसंपन्नअसतात. जात्यावरच्या ओवीचे एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे 'गाथा'ज्याप्रमाणे स्वयंपूर्ण आशयाची असते. त्याप्रमाणे ओवीदेखील अर्थाच्या दृष्टीने संपूर्ण असते. हा आशय कळण्यासाठी दुसऱ्या कोणत्याही बाह्य संदर्भाची आवश्यकता नसते. ओवीचा आशय स्वयंपूर्ण व स्वतंत्र असतो. त्यामुळे प्रत्येक ओवीला स्वःताचे असे स्वायत्त अस्तित्व असते. ज्याप्रमाणे लोककथांतील कल्पनाबंध हे कथेचे एक स्वतंत्र 'एकक' असते. त्याप्रमाणे ओवीदेखील स्वतंत्रपणे, सुटसुटीत 'एकका' च्या स्वरुपात एका पिढीकडून दुसऱ्यापिढीकढे साहचर्यामुळे हस्तांतरित होते आणि प्रवाही होत असते.

परंपरेने आलेल्या ओविगीतांमध्येशब्दांवर स्वराचे आधिपत्य असते. स्वरप्रधानता हे त्यांचे प्रमुख लक्षण असते. लयप्रधान रचना हे तिचे रूप असते. ओवीतील शब्द गेयरूपाच्या सोयीनुसार सहज व स्वाभाविकपणे योजले जातात. गाणारी स्त्री शब्दांची जाणीवपूर्वक निवड करीत नाही किंवा ती शब्द राबवीत नाही. ओवींच्या


ISSN No. 2319-6025

गेय स्वरूपालासाजेल अशा शब्दांची निवड सहजपणे करते. येथे रचनेचा खटाटोप नसतो. थोडक्यात, ओवीतील शब्दांच्या संदर्भात ग्रांथिक भाषेत जो काटेकोरपणा असतो. मौखिक ओवीत मात्र शब्दांचे वळण, उच्चार, जोडणी यात शैथिल्य असते. कारण ओवी गाताना रचनासौंदर्याकडे लक्ष नसते. कोणी ऐकावे म्हणून ती स्त्री गात नसते. तर आंतरिक उर्मीतून सहजपणे साकारलेले गीत असते. त्यातून झालेल्या भावनाविष्काराची मोहिनी आजही मराठी राशिकांच्या मानावर आहे.

जात्यावरच्या ओव्यांमध्ये सुख-दुःखाचे प्रामाणिक असे वास्तवचित्रण असते. कुठेही रचनेसाठी खटाटोप केला जात नाही. स्त्रियांच्या जीवनातील कल्पनाविलास, रचनाचातुर्य आणि वर्णनशैली यामुळे ती वाड;मयीनदृष्टया महत्त्वाची ठरली आहे. काव्यात भावनाविलास महत्त्वाचा असला तरी कल्पनाविलास आणि रचनाचातर्यतितकेच महत्त्वाचे असते. भावनेची मांडणी नीटनेटकी आणि वेगवेगळ्या परीने झाली की, ती आल्हाददायक वाटते. तिच्यात काव्य येते. एकचवस्तू किंवा भावना निरनिराळ्या स्वरुपात नि परिवेशात प्रकट झाली की तिच्यात पृथगात्मता येते. या ओवीतून सहजपणे होणारा भावनाविष्कार कितीतरी व्यापक अर्थ सांगून जातो. घराघरातील प्रेम, स्नेहबंधन, सुख-दुःख, अडी-अडचणी,आदींचीजीवनगाथा स्त्री अपल्या ओवीतून मांडते. ती भावनाप्रधानआणि हळवी आहे. त्याचा प्रत्यय आपणास ओवीतून येतो. स्त्रीच्या भावविश्वात माहेराला एक आगळेच स्थान प्राप्त झालेले असते. कारण बालपण घालविलेले माहेर स्त्रीला अधिक जवळचे वाटते. माहेरच्या प्रत्येक व्यक्तीशी विकसित झालेले दृढ भावसंबंध स्त्रियांच्या मनात खोलवररुजलेले असल्याने लग्नानंतर प्रत्येक ठिकाणी तिला माहेर आठवत. सासरची माणसे व माहेरची माणसे यांच्या प्रेमातील तफावत तिला पावलापावलावर जाणवते. आई-वडील,बहिण-भाऊ, मामा-मामी, आत्या यांच्याविषयीचा जिव्हाळा, आत्मीयता, आदर आणि अभिमान हे भाव जात्यावर गात असताना अत्यंत उत्कटतेने व्यक्त होतात.

गाते माहेरचं गाणं
लेक येईन रे पोटी !
लेकीच्या माहेरासाठी
माय सासरी नांदते.

लेकीच्या माहेरासाठी सासरी त्रास सहन करणारी व सहनशील स्त्री जात्यावरच्या ओवीत पहायला मिळते. कधी कधी मात्र तिला स्त्रीजन्माबद्दलची उदासीनता वाटते.

लेकीच्या जन्माला नको घालूदेवराया ।
मायबाईची माया फुकट जाती वाया ।
अस्तुरीचा जन्म नको घालूश्रीहरी ।
संसारी येऊनपरायाची ताबेदारी ।

भारतीय संस्कृतीतील स्त्री ही सोशीक आहे. सहनशीलता हे तिचे वैशिष्ट्ये आहे. आई आपल्या मुलीला लहानपणापासूनच कष्ट करण्याची, सहनशीलतेची सवय लावते. सासरी कसं वागायचं, सासरी किती त्रास झाला तरी कुणालाही उलट उत्तर करायचे नाही. असे आई आपल्या मुलीला सांगते.

'दळण दाळूनी, अंगाच्या झाल्या गंगा ।
माय माउलीने,चारिल्या लवंगा ।।
दळण दळितिया, बाय गं बळ माझ।
वाघिणीचं दुधतुझंमायबाई ।।

दळण दळताना शरीराला जे कष्ट होते आणि अंगावरून घाम ओघळतो. घामाने न्हाऊननिघणार्यास्त्रीला कष्ट करण्याचे बळ आईकडूनच मिळालेले असते. त्यासाठी 'वाघिणीचं दुधा' बद्दलचा अभिमान ओव्यातून व्यक्त होतो. कारण हे बळ माझं नाही तर प्रेरणा देणाऱ्या आईचं आहे असे तिला वाटते.

'जीवाला माझ्या जड । माझी दुखती नखंबोटं

।

बाया माझी ग मालन । बाई वैदन गेली कुठं।।

मुलीला झालेल्या वेदना, दुःख आईला न सांगताच समजतात. कारण आईनेही सासूरवासभोगलेला असतो. तिने अनुभवलेला असतो. लेकही जात्याला आपली आई समजूनच सगळ्या भावना व्यक्त करते. आईच्या प्रेमळ आठवणी ओवीतून पहायला मिळतात.

लोकासंस्कृतीतील स्त्रीची प्रतिमा लोकसाहित्यातून प्रतिबिंबित झालेली पहायला मिळते. सासरी कितीही कष्ट केले तरी तिची जागा पायपुसण्याजवळची. नव्याने आलेल्या सुनेला अनेक बंधने घातली जातात. तिने फक्त नियमाने वागावे, कुठलीही मर्यादा केवळ तिच्यासाठीच असल्याचे दिसते. अशावेळी माहेरच्या माणसांच्या बालपणातील सुखद अनुभवांच्या आठवणीवर राहण्याशिवाय तिच्याकडे पर्याय नसे. तेव्हा ती मुर्हाळी म्हणून येणाऱ्या भावाची वाट पाहते.

'दळण गं दळीतानाखुटयाचा हात सुट
लाडका भाऊ माझा जीवाचा सखा भेटे
दळण दळते सोनसळी गहू । तूप पोळी लाटेन भेटी आला भाऊ ।।
चांदीची पोळपाटी पिठाच्यागंधगोळया ।
सोन्याच्या लाटण्यानंलाटते पुरणपोळ्या ।।

भाऊ भेटला की तिच्या आनंदाला उधान येते. त्याच्यासाठी काय करू आणि काय नको अशी तिची अवस्था होते. बहिणीचे भावावरील प्रेम कायम असते. ती आपल्या भावाच्या रूपाचे, गुणांचे वर्णन करते. भावाबद्दल असणारा अभिमान ओवीतून चित्रित होतो.

भाऊ करता करता डोळा आला पाणी ।
परायी नार येता, भाऊ झाला लोकावानी ।
'भाऊ गं म्हणतो आल्या बहिणीभेटाया
भावजयी गं म्हणती आल्या नणंदा लुटाया ।

भावाला बहिणीबद्दल प्रेम, आपुलकी,असते;पण भावजयीपुढे त्याचं काही चालत नाही.हे बहिणीलाही माहिती असते.मग ती भावासाठी भावजयीलाहीमोठेपणा देण्यात धन्यता मानते.


ISSN No. 2319-6025

भावाच्या परीस भावजयी गं लय रतन
सोन्याच्या कारणे चिंधी करावी जतन.

सोन्यासारख्या भावासाठी ती भावजयीलाहीजपते.भावाप्रमाणे ती आपल्या कुंकवाच्या धन्यालाही जीवापाड जपते. नवऱ्यालादेवरूप देणारी पतीव्रताओवीतून चित्रित झाली आहे.

दुबळ्या भरताराची नार करीतीहेलइना
कपाळीचं कुंकू सोनं दिल्यानंमिळईना

पती तिच्याशी कसाही वागला, तरी ती मात्र पतीची अवहेलना होऊ देत नाही. कारण कपाळीचं कुंकू सोनं दिलं तरी परत मिळत नाही. याची तिला पुरेपूरजाणीव आहे. लोकसंस्कृतीत कुंकू, चुडा, मंगळसूत्र यांना एक विशिष्ट भावनात्मक स्थान आहे. आपला पती दीर्घायु व्हावा, तो सुखी राहावा म्हणून पहाटेच्या पार्यामंदीसुर्व्याला हात जोडणारी 'लक्ष्मी' लोकसाहित्यात पहावयास मिळते.

स्त्रीच्या जीवनातील खरा अलंकार म्हणजे तिचा पती. ती पती भक्तीत मग्न होते. ती म्हणते,

जाचू नका राया, तुमच्या पायाची मी दासी
राहीन उपाशी, घास घालीनतुमासी
सासरचे कष्ट राया, सारे साहून घेईन
जीवन मी अर्पिन, वात इंद्रावनी ठेवीन
दिलाचा हेत राया, तुमासांगू कवण्यापरी
उभी साऊली खाली, एकटे तुमीमह्येहरी ।।

या ओवीतून व्यक्त होणाऱ्यास्त्रीजीवनात तिच्या पतीला देवाइतके उच्च स्थान आहे. पतीची दासी म्हणून घेण्यात तिला सुख वाटते. पतीसाठी सासरी होणारा त्रास ती सहन करते. पातिव्रत्य आणि सतित्वहे स्त्री गौरवाचे मानबिंदू ठरविण्यात येवून तसे आचरण करण्यातच स्त्रीजीवनाचेसार्थकत्वआहे. असा विचार तिच्या मनावर लहानपणापासून बिंबवला जात असे. म्हणूनच पतीसाठी ती व्रत्त-वैकल्य, उपास-तापस करताना दिसू लागली. त्याचे प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले पहायला मिळते.

आपल्या मनातील भावना व्यक्त करताना घराघरातील प्रेम, स्नेहसंबंध, सुख-दुःख, अडी-अडचणी आदींचीजीवनगाथा स्त्री आपल्या ओवीगीतातून मांडते.

**संदर्भ :**

१) अलका चीडगोपकार, बहिणाबाईंची गाणी, स्नेहवर्धनपब्लिशिंग हाऊस, पुणे, २०००

२) रमेश कृ. देवरे, लोकसाहित्य दर्शन, कर्मवीर प्रकाशन, पुणे, २००९.

३) डॉ. सुलक्षणा कुलकर्णी, सुहासकुमार बोबडे, भावहिंदोळेस्त्रीमनाचे, युगश्री प्रकाशन, कराड,१९९९.

४) प्रभाकर मांडे, लोकपरंपरेतील स्त्री-प्रतिमा,दिलीपराज प्रकाशन, पुणे.